Vol II Issue IX

ISSN No : 2230-7850

Monthly Multidiciplinary
Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue. 9, Oct 2012
ISSN:-2230-7850

Available on all social networks
citeulike

ORIGINAL ARTICLE

# *अंतर्मुखी आणि बहिर्मुखी व्यक्तिमत्त्व असलेल्या विद्यार्थ्यांच्या अल्पकालीन स्मृती व दीर्घकालीन स्मृतीचा तुलनात्मक अभ्यास*

***नरेंद्र गिरधर पाचपांडे***

प्र. प्राचार्य
एनबीपी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अमळनेर. जि. जळगाव.

***सारांश :***

या संशोधनात संशोधकाने अंतर्मुखी आणि बहिर्मुखी व्यक्तिमत्त्व असलेल्या प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या अल्पकालीन स्मृती आणि दीर्घकालीन स्मृतीचा तुलानात्मक अभ्यास केला आहे. या संशोधनासाठी जळगाव जिल्ह्यातील आर आर विद्यालयातील इयत्ता 7वीच्या 102 विद्यार्थ्यांचा समावेश केला होता. यात असे निदर्शनास आले की, प्राथमिक स्तरावर अंतर्मुखी व्यक्तिमत्त्व आणि बहिर्मुखी व्यक्तिमत्त्व असलेल्या विद्यार्थ्यांच्या अल्पकालीन स्मृती आणि दीर्घकालीन स्मृती मध्ये सार्थ सहसंबंध आढळत नाही.

प्रस्तावनाः

जीवनात वेगवेगळया व्यक्तिमत्त्वाच्या व्यक्ती आढळतात. कोणत्याही एका व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व तंतोतंत दुसऱ्या एखाद्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वासारखे असत नाही. स्विस मानसशास्त्रज्ञ कार्ल यूंगच्या मते व्यक्तीचे प्रमुख दोन गटात वर्गीकरण केले जाते ते अंतर्मुखी व्यक्तिमत्त्व आणि बहिर्मुखी व्यक्तिमत्त्व होय. वेगवेगळया मानसशास्त्रज्ञांनी व्यक्तिमत्त्वाच्या व्याख्या वेगवेगळया केलेल्या आहेत. नार्मल एल. मन. 'व्यक्तिमत्त्व म्हणजे शरीररचना वर्तन विशेश अभिरूची, कृतीक्षमता या सर्वाची एकात्म व वैशिश्टपूर्ण गुंफण होय'. जी. डब्लू. आलपोर्टः 'व्यक्तिमत्त्व म्हणजे स्वतःच्या परिसराशी व्यक्तीचे जे वैशिश्टपूर्ण  समायोजन होत असते, त्याला कारणीभूत असणारी व वर्तनाला चालना देणारी शारीरिक व मानसिक यंत्रणांची गतीशील संघटना होय.' गार्डन अलपोर्ट यांच्या वरील व्याखेतील तीन शब्द समूह अतिशय महत्त्वाचे आहे. गतीशील संघटना या शब्द समूहातून व्यक्तिमत्त्वामध्ये विविध घटकांची परस्परात आंतरक्रिया चालू असते हे सूचित होते. शारीरिक व मानसिक यंत्रणा या शब्द समूहाने व्यक्तिमत्त्वाच्या घडणीत शारीरिक व मानसिक या दोन्ही प्रकारच्या घटकांचा समावेश झालेला असतो हे सुचवायचे आहे व ह्या यंत्रणांचा संबंध व्यक्तीच्या स्मरण प्रक्रियेशी येतो. कार्ल यूंग या मानसशास्त्रज्ञाने निरनिराळा व्यक्तींची त्यांच्या स्वभावानुसार अंतर्मुखी आणि बहिर्मुखी अशा दोन गटात विभागणी करता येते असे प्रतिपादन केले आहे. युंगच्या म्हणण्याप्रमाणे बहिर्मुखी व्यक्ती चार चौघांना धरून वागणारी, परिस्थितीशी जुळवून घेणारी, मोकळयापणाने बोलणारी, बेडर, व्यवहारी दृश्टीची व कृतीप्रवण असते. अंतर्मुखी व्यक्ती मनाने हळवी, आत्मपरीक्षण करणारी, मितभाशी, आदर्शवादी, एकलकोंडया स्वभावाची आणि वागणूकीत काटेकोर अशी असते.

मानवी जीवनात बऱ्यावाईट स्मृतीचे गाठोडे. जीवनात घेतलेले अनुभव पुनःपुन आठवणे म्हणजे स्मरण होय. जीवनात या मनोव्यापाराचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

शालेय जीवनात विविध विशयातील घटकांचे  अध्ययन विद्यार्थी करतो. आशय विद्यार्थ्यांच्या कायम स्वरूपी स्मरणात राहावा ही शिक्षकांची अपेक्षा असते. त्या अनुशंगाने शाळेत प्रयत्न केले जातात. याकरीता विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व आणि स्मृती यांच्या मधील सहसंबंधाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

संबंधित साहित्याचे सर्वेक्षणः

जीवनात व्यक्तीची ओळख ही त्याच्या व्यक्तिमत्त्वावरून होत असते. त्यामुळे व्यक्तिमत्त्व ही महत्त्वाची संकल्पना आहे. त्याच प्रमाणे स्मरण ह्या मनोव्यापाराचा संबंध मानवी व्यक्तिमत्त्वाशी निगडीत आहे. शाळेत विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती ही वेगवेगळी असते. काही विद्यार्थी एखाद्या आशयाचे स्पश्टीकरण पटकन करतात तर काहींना स्पश्टीकरण देण्यासाठी वेळ लागतो.  तसेच काहींना आशय दीर्घकाळापर्यंत स्मरणात राहतो. तर काही विद्यार्थी आशय अल्पकाळापर्यंत स्मरणातच ठेवू  शकतात नंतर तो विसरतात. याकरीता संशोधकाने विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व आणि विद्यार्थ्यांची अल्पकालीन स्मृती व दीर्घकालीन स्मृती यातील सहसंबंधाचा अभ्यास करण्याचे ठरविले होते. या विशयी काही संशोधकांनी या विशयी संशोधन केले आहेत. आयसेंक,(1967) यांनी त्यांच्या सिध्दांतामध्ये बहिर्मुखता आणि अंतर्मुखतेच्या वर्णनात्मक संकल्पनेचा संबंध शरीर वर्तन विज्ञान बांधणीच्या चेतना आणि जागृतीशी केला आहे. श्रीवास्तव, एस.एस.(1970) यांनी संशोधनात कॅटेलचे व्यक्तिमत्त्व घटक आणि अलाईडचा अभ्यास यावर आधारित बहिर्मुखता आणि अंतर्मुखता चाचणी तयार केली आणि या चाचणीची सप्रमाणता पाहिली होती. वर्मा, के. (1988) यांनी संशोधनात इतर चलांबरोबर व्यक्तिमत्त्व या चलाचा अभ्यास अल्पकालीन आणि दीर्घकालीन स्मृतीच्या संदर्भात 12 ते 20 वर्शे वयोगटातील प्रयोज्यांच्या जोडयांच्या संघावर केला होता. तसेच या अभ्यासात व्यक्तिमत्त्व या चलात बहिर्मुखतेचा अभ्यास केला होता.

या सर्व संशोधनाचे सर्वेक्षण केले असता असे आढळून आले की प्राथमिक स्तरावर अंतर्मुखी व्यक्तिमत्त्व आणि बहिर्मुखी व्यक्तिमत्त्वाच्या अल्पकालीन स्मृती आणि दीर्घकालीन स्मृतीचा तुलनात्मक अभ्यास केला गेला नाही म्हणून प्रस्तुत संशोधनात संशोधकाने प्राथमिक स्तरावर अंतर्मुखी आणि बहिर्मुखी व्यक्तिमत्त्व असलेल्या विद्यार्थ्यांच्या अल्पकालीन स्मृती व दीर्घकालीन स्मृतीचा तुलनात्मक अभ्यास

**Please cite this Article as :** नरेंद्र गिरधर पाचपांडे, ***अंतर्मुखी आणि बहिर्मुखी व्यक्तिमत्त्व असलेल्या विद्यार्थ्यांच्या अल्पकालीन स्मृती व दीर्घकालीन स्मृतीचा तुलनात्मक अभ्यास* : Indian Streams Research Journal (Oct. ; 2012)**

करण्याचे ठरविले आहे.

गरज व महत्त्वः

विद्यार्थ्यांचा दिवसातला बराच कालावधी शाळेत जातो. अध्यापनाबरोबर विद्यार्थ्यांचा विविध अंगांनी विकास होण्यासाठी शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमात विद्यार्थी सहभागी होतात. त्यामुळे विद्यार्थी विविध अंगांनी घडत जातो.

शाळेत वेगवेगळे व्यक्तिमत्त्व असलेले विद्यार्थी शिक्षण घेत असतात. अशा वेगवेगळे व्यक्तिमत्त्व असलेल्या विद्यार्थ्यांची भावनिक, मानसिक क्षमता ही वेगवेगळी असते. शिक्षक व विद्यार्थी यांच्या मध्ये एक प्रकारची मूक आंतरक्रिया चालू असते. या आंतरक्रियेमुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडत असते. अशा व्यक्तिमत्त्व घडलेल्या विद्यार्थ्यांची अल्पकालीन स्मृती आणि दीर्घकालीन स्मृती क्षमता कशा प्रकारची असते. याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

ज्ञानेंद्रियाच्या सहाय्याने घेतलेले अनुभव व्यक्ती जतन करतो आणि जरूर तेव्हा आठवतो. घेतलेले अनुभव जतन करून आठविता येण्याची ही जी देणगी व्यक्तीला लाभलेली आहे. शिकलेले शब्द व त्यांचे अर्थ समजलेले विविध संबोध, परिचय झालेल्या व्यक्ती व पदार्थ, कळलेले वस्तूंचे गुणधर्म, अभ्यासिलेल्या पध्दती इत्यादी व्यक्ती, विद्यार्थी आठवू शकतो.

शाळेत शिक्षक विद्यार्थ्यांना अनेक विशयांचे ज्ञान देतात. विद्यार्थ्यांनी संपादन केलेले ज्ञान त्यांच्याकडे दीर्घकाळ राहावे, शिकलेल्या गोश्टी आवश्यक तेव्हा त्यांना आठविता याव्यात याकरीता प्रयत्न केले जातात. म्हणजेच विद्यार्थ्यांच्या स्मृतीत ज्ञान राहावे व त्या ज्ञानाचा उपयोग विविध परिस्थितीत करता यावा ही अपेक्षा असते यासाठी स्मृती व व्यक्तिमत्त्व यांचा विद्यार्थ्यांच्या संपादनाबाबत कोणता संबंध आहे हे पाहणे गरजेचे ठरते. त्याकरीता संशोधकाने अंतर्मुखी व बहिर्मुखी व्यक्तिमत्त्व असलेल्या विद्यार्थ्यांच्या अल्पकालीन स्मृती व दीर्घकालीन स्मृती बाबत तुलनात्मक अभ्यास केलेला आहे.

उद्दिश्टेः

1.अंतर्मुखी व बहिर्मुखी व्यक्तिमत्त्वाच्या विद्यार्थ्यांच्या अल्पकालीन स्मृतीचा तुलनात्मक अभ्यास करणे.

2.अंतर्मुखी व बहिर्मुखी व्यक्तिमत्त्वाच्या विद्यार्थ्यांच्या दीर्घकालीन स्मृतीचा तुलनात्मक अभ्यास करणे.

3.विद्यार्थ्यांच्या अल्पकालीन व दीर्घकालीन स्मृतीचे मापन करण्याकरीता विज्ञान विशयाची संपादन चाचणी तयार करणे.

परीकल्पनाः

1.अंतर्मुखी व्यक्तिमत्त्व व बहिर्मुखी व्यक्तिमत्त्व असलेल्या विद्यार्थ्यांच्या अल्पकालीन स्मृती मध्ये सार्थ सहसंबंध आढळत नाही.

2.अंतर्मुखी व्यक्तिमत्त्व व बहिर्मुखी व्यक्तिमत्त्व असलेल्या विद्यार्थ्यांच्या दीर्घकालीन स्मृती मध्ये सार्थ सहसंबंध आढळत नाही.

न्यादर्शः

या संशोधनाचा मूळ उद्देश हा अंतर्मुखी आणि बहिर्मुखी व्यक्तिमत्त्वाच्या विद्यार्थ्यांच्या अल्पकालीन स्मृती आणि दीर्घकालीन स्मृतीच्या सहसंबंधाचा अभ्यास करणे आहे. जळगाव शहरातील आर. आर. विद्यालयातील इयत्ता 7वीच्या 102 विद्यार्थ्यांची निवड स्तरीत यादृच्छिक पध्दतीने केली होती.

साधनेः

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने माहिती गोळा करण्यासाठी 1. डॉ. पी. एफ. अजीज आणि डॉ. रेखा अग्निहोत्री यांची व्यक्तिमत्त्व कसोटी. 2. विज्ञान घटक चाचणी (दोन घटकांसाठी दोन स्वतंत्र चाचण्या तयार करण्यात आल्या होत्या प्रत्येक चाचणी 20 गुणांची होती) या साधनांचा वापर केला होता.

कार्यवाहीः

प्रस्तुत संशोधनाकरीता संशोधकाने सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे. संशोंधकाने आर. आर. विद्यालय जळगाव ता. जि. जळगाव या शाळेतील इयत्ता 7 वीच्या विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व चाचणी दिली. चाचणी तपासल्यानंतर विद्यार्थ्यांना मिळालेल्या गुणांकानुसार विद्यार्थ्यांचे अंतर्मुखी व्यक्तिमत्त्व व बहिर्मुखी व्यक्तिमत्त्व अशा दोन गटात वर्गीकरण केले. त्या विद्यार्थ्यांना शाळेत शिक्षकांनी अध्यापन केलेल्या सजीवांचे वर्गीकरण आणि वनस्पती अवयव व रचना या घटकांवर तयार केलेल्या स्वतंत्र विज्ञान संपादन चाचण्या घटकांचे अध्यापन झाल्यानंतर लगेच अल्पकालीन स्मृतीचे मापन करण्याकरीता देण्यात आल्या. प्रत्येक चाचणीही 20 गुणांची होती. ह्याच चाचण्या 30 दिवसानंतर विद्यार्थ्यांच्या दीर्घकालीन स्मृतीचे मापन करण्याकरीता विद्यार्थ्यांना अनुक्रमे देण्यात आल्या होत्या. सदर चाचण्या तपासून गुणांक याद्या तयार करण्यात आल्या त्यानंतर सांखिकीय विश्लेशण करण्यात आले होते.

संख्याशास्त्रीय विश्लेशणः

तक्ता क्र 1ः अंतर्मुखी व्यक्तिमत्त्व व बहिर्मुखी व्यक्तिमत्त्व असलेल्या विद्यार्थ्यांच्या अल्पकालीन स्मृती गुणांकांचा व दीर्घकालीन स्मृती गुणांकांचा सहसंबंध गुणांक

| अ.न. | व्यक्तिमत्त्व प्रकार | स्मृती | सहसंबंध गुणांक | सारणी मूल्य | सार्थकता स्तर | सार्थक/असार्थक |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अंतर्मुखी व बहिर्मुखी | अल्पकालीन | 0.120 | 0.195 | 0.05 | असार्थक |
| 2 | अंतर्मुखी व बहिर्मुखी | दीर्घकालीन | 0.165 | 0.195 | 0.05 | असार्थक |

निष्कर्ष व चर्चाः

1.अंतर्मुखी व्यक्तिमत्त्व व बहिर्मुखी व्यक्तिमत्त्व असलेल्या विद्यार्थ्यांच्या अल्पकालीन स्मृती गुणांकांचा सहसंबंध गुणक स्वाधीनता मात्रा 100 करीता 0.05 स्तरावर 0.120 असून तो सार्थक नाही.

2.अंतर्मुखी व्यक्तिमत्त्व व बहिर्मुखी व्यक्तिमत्त्व असलेल्या विद्यार्थ्यांच्या दीर्घकालीन स्मृती गुणांकांचा सहसंबंध गुणक स्वाधीनता मात्रा 100 करीता 0.05 स्तरावर 0.165 असून तो सार्थक नाही.

वरील निश्कर्शावरून असे निदर्शनास येते की, अंतर्मुखी व्यक्तिमत्त्व व बहिर्मुखी व्यक्तिमत्त्व असलेल्या विद्यार्थ्यांच्या अल्पकालीन स्मृती मध्ये सार्थ सहसंबंध आढळत नाही. तसेच अंतर्मुखी व्यक्तिमत्त्व व बहिर्मुखी व्यक्तिमत्त्व असलेल्या विद्यार्थ्यांच्या दीर्घकालीन स्मृती मध्येही सार्थ सहसंबंध आढळत नाही. म्हणजेच शालेय स्तरावर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा त्यांच्या स्मृतीवर कोणताही परिणाम होत नाही.

## संदर्भः

आफळे, रा. रा., बापट, भा. वे. (1973). शिक्षणाचे मानसशास्त्रीय अधिश्ठान. श्रीविद्या प्रकाशन, पुणे.
दांडेकर,वा.ना.(2000). शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र. श्रीविद्या प्रकाशन, पुणे.
जगताप,ह.ना.(1991). शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र. श्रीविद्या प्रकाशन, पुणे.
कुलकर्णी,के.व्ही.(1990). शैक्षणिक मानसशास्त्र. श्रीविद्या प्रकाशन, पुणे.
मुळे,रा.श., उमाठे,वि.तु.(1987). शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे. महाराश्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मीती मंडळ, नागपूर.
वाळुंजकर, पु.गो आणि इतर,(2007). सामान्य विज्ञान (पुस्तक चौथे–इयत्ता सातवी) महराश्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मीती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,
We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net